# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि पहिली खबर क्र. FIR No. २९/२४ वर्ष Year २०२४ दिनांक Date १६/०७/२०२४

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from ३०/०६/२४ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to १६/०७/२४ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १५/०७/२०२४ वेळ Time सकाळी ६:३४ वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०५/२४ तारीख Date १६/०७/२०२४ वेळ Time सकाळी ६:३४ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name शहिद टी स्टॉल ठिकाणाचे नंबर No. if any गोवंडी (प.) गल्ली Ward वीर जिजामाता रोड रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name फिरोज ओखु खान
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name ओखु खान
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४४ वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
(f) व्यवसाय Occupation ........
(g) धर्म Religion मुस्लिम जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address रुम गौतम नगर गल्ली/सर्व्हे नं. Ward प्लॉट नं. ४ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road भीमवाडी रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place पोलिस ठाणे बीट क्र. २ चे जवळ गाव Village गोवंडी, मुंबई पोस्ट Post ४०००४३ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) हरिकृष्णा आदिमुलम, वय 32 वर्षे, पद- कामगार, खाते- नगर अभियंता, बीएमसी, एम पूर्व वार्ड, गोवंडी, मुंबई पत्ता- रूम नं 6 देवनार म्युनिसिपल कॉलनी, पहाणा ..., गोवंडी, मुंबई
2) राहुल कोळेकर, पद- ज्युनियर इंजिनियर, बीएमसी एम पूर्व वार्ड, गोवंडी, मुंबई



Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. फिरोज खान यांचा स्वतंत्र पुरावा टंकलिखित करण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

फिरोज

समक्ष
(स्वाक्षरी)
गणपत पस्थाके
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक १७/०७/२०२५

श्री. फिरोज जोखु खान, वय ४४ वर्षे, धंदा– बांधकाम ठेकेदार, रा. न्यु गौतम नगर, पार्ट नं. ४, भिमवाडी रोड, पोलीस स्टेशन बिट क्र. २ चे जवळ, गोवंडी, मुंबई ४०००४३. मो. नं. ९००४७३६२४७, आधार कार्ड क्रमांक ५७६४ ३३३४ २५०९.

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर गेल्या २५ वर्षापासून माझे कुटूंबियासह रहावयास आहे. मी 'वारसी इंटरप्रायजेस' या नावाने गोवंडी परीसरातील झोपडपटटीमधील घरांचे बांधकामाची कामे घेवून बांधकाम करीत असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये श्री. अब्दुल्ला खान, रा.ठि न्यु गौतम नगर, पार्ट नं. ४, भिमवाडी रोड, सुदर्शन डेअरीचे जवळ, गोवंडी यांचे मालकीच्या असलेल्या १० बाय १२ फुट आकाराच्या रुमचे बांधकामाचे काम घेतले होते. त्या रुमच्या पहील्या माळयाचे वर असलेल्या पत्र्याचे शेड काढुन, दुसऱ्या माळयाचे बांधकाम करुन त्याचेवर पत्र्याचे शेड रु. ४,००,०००/– मध्ये तयार करुन देणार होतो. एप्रील महिन्यामध्ये दुसऱ्या माळयाचे बांधकाम केल्यानंतर माझे खाजगी अडचणींमुळे मी तेथील काम थांबविले होते.

दिनांक ३०/०६/२०२५ पासुन ते बांधकाम पुन्हा सुरु केले असता त्याठिकाणी बीएमसी, एम पुर्व वार्ड, गोवंडी येथील सरकारी कामगार श्री. हरिकृष्णा हे आले. त्यांनी जमिनीपासुन १४ फुट उंचीपेक्षा जास्त बांधकाम करण्यास मनाई असुन बांधकाम केल्यास ते बांधकाम बीएमसी कडून काढुन टाकण्यात येईल तसेच रुम मालकावर कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे सांगितले. बीएमसी कडून होणारी कायदेशिर कारवाई टाळावयाची असेल तर बांधकाम करण्यापुर्वी एम पुर्व वार्ड, गोवंडी येथील ज्युनिअर इंजिनिअर श्री. राहूल कांबळे साहेबांना भेटावे लागेल असे बोलुन बांधकाम थांबविण्यास सांगुन निघुन गेले.

मी दिनांक ०७/०७/२०२५ रोजी एम पुर्व वार्ड, गोवंडी येथील ज्युनिअर इंजिनिअर श्री. राहूल कांबळे साहेबांची भेट घेतली. त्यांनी मला रुमचे बांधकाम झालेनंतर कोणतीही कायदेशिर कारवाई न करण्यासाठी ५०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तेंव्हा मी त्यांना सांगितले की, सदर बांधकामात मला रु. ५०,०००/– पण फायदा मिळणार नाही. त्यावेळी त्यांनी कारवाई न करण्याकरीता कमीतकमी रु. २०,०००/– रुपये दयावे लागतील असे सांगितले.

दिनांक १०/०७/२०२५ रोजी श्री हरिकृष्णा हे बांधकामाचे ठिकाणी आले. मी तेथे हजर नसल्याने त्यांनी त्यांचे मो.क्र. ९७०२८८६३४० यावरुन माझे मोबाईलवर फोन करुन मला सांगितले कि, तुला पुढील बांधकाम करावयाचे असेल तर कांबळे साहेबांनी सांगितलेप्रमाणे रु. २०,०००/– दयावे लागतील. दुसऱ्या दिवशी दिनांक ११/०७/२०२५ रोजी मी श्री हरिकृष्णा यांचे मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी सांगितले की, श्री. कांबळे साहेब हे सुटटीवर असून दि.१५/०७/२०२५ रोजी ऑफिसला येणार आहेत. दिनांक १५/०७/२०२५ रोजी मी श्री हरिकृष्णा यांचे मोबाईलवर पुन्हा कॉल केला असता त्यांनी सांगितले की, श्री. कांबळे साहेब हे दिनांक १६/०७/२०२५ रोजी ऑफिसला येणार आहेत.

मला लोकसेवक श्री. राहूल कांबळे व श्री हरिकृष्णा यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १५/०७/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या ठिकाणी गेलो. तेथे माझे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता एसीपी चंद्रकांत माळी व पोलीस निरीक्षक गणपत परचाके यांची नेमणूक करण्यात आली. श्री परचाके साहेब यांनी मला बीएमसी, एम पुर्व वार्ड, गोवंडी येथील ज्युनिअर इंजिनिअर श्री. राहूल कांबळे व सरकारी कामगार श्री हरिकृष्णा हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. परंतू मला व्यवस्थित लिहीता येत नसल्याने परचाके साहेबांनी माझा अर्ज लॅपटॉपमध्ये मराठित मी सांगितल्याप्रमाणे टाईप केला व त्याची प्रिंट काढल्यांनतर वाचुन मी त्यावर सही केली. त्यांनतर दोन पंचाना बोलाविण्यात आले. परचाके साहेबांनी त्यांची श्री. स्वप्निल माने व निखील जमदाडे अशी ओळख करुन दिली. तो तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला असता अर्ज वाचुन दोन पंचांनी, परचाके साहेब व माळी साहेबांनी त्यावर सही केली. सदर तक्रार अर्ज परचाके साहेबांनी स्वतःचे ताब्यात ठेवला. त्यानंतर परचाके साहेबांनी माझे

Scanned with OKEN Scanner

तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याने सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली. दररोज सायंकाळी ०५.३० वाजता बीएमसी वॉर्ड ऑफीस बंद होत असते व उशीर झाल्यामुळे पडताळणी कारवाई उद्या करु अशी मी परचाके साहेबांना विनंती केली असता त्यांनी मान्य करुन दिनांक १६/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे येण्यास सांगितले.

मी दिनांक १६/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा.चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. तेथे पडताळणी कारवाईकरीता माझे, दोन्ही पंच व परचाके साहेब यांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता परचाके साहेब, माळी साहेब, मी, दोन्हीं पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातुन गोवंडी, मुंबई येथे जाण्यास निघालो. दोन्हीं पोलीस वाहने छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल हायस्कुल गेटजवळ, वीर जिजामाता रोड, गोवंडी पश्चिम, मुंबई येथे थांबविण्यात आली. पडताळणी कारवाईकरीता माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री माने यांचेसोबत बीएमसी ऑफीस, एम पुर्व वार्ड, गोवंडी येथे ज्युनिअर इंजिनिअर राहुल कांबळे यांना भेटण्यास पाठविण्यात आले. तेथे गेल्यानंतर कांबळे साहेब दिसुन न आल्याने मी चौकशी केली असता ते ऑफीसमध्ये नसल्याचे कळाले. त्यानंतर मी व पंच माने छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल हायस्कुलपाशी पडताळणी पथकाजवळ परत आलो. तेथे थोडया वेळाने श्री हरिकृष्णा यांना मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी वीर सावरकर हायस्कुल, विर जिजामाता रोड, गोवंडी पश्चिम, मुंबई येथे भेटण्यास बोलाविले. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री माने यांचेसोबत श्री. हरिकृष्णा यांना भेटण्यास पाठविण्यात आले. मी हरिकृष्णा यांस भेटलो असता त्यांनी बांधकामावर कारवाई न करण्याकरीता स्वत:साठी व ज्युनिअर इंजिनिअर राहुल कांबळे यांचेसाठी रु. २०,०००/– लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना ५ ते ६ हजार रुपये रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यांनी माझे व पंचासमक्ष राहुल कांबळे यांना मोबाईलवर कॉल करुन ५ ते ६ हजार रुपये कमी करण्याबाबत मी विनंती केली आहे असे सांगितले असता राहुल कांबळे यांनी रक्कम कमी होणार नाही २० हजार रुपये दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर श्री. हरिकृष्ण यांनी सायंकाळी ०५.३० ते ०६.०० वाजेपर्यंत लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री माने पडताळणी पथकाजवळ परत आलो. तेथे व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डिंग पंचासमक्ष ऐकण्यात आले. त्यामध्ये श्री राहुल कांबळे व श्री. हरिकृष्णा यांनी माझेकडे २० हजार रुपये लाच मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे आढळुन आले. त्यानंतर आंम्ही सर्व अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो.

श्री हरिकृष्णा यांनी लाचेची रक्कम घेवून बोलावले असल्याने परचाके साहेब यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत माहिती दिली. श्री. परचाके साहेब यांनी माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रकमेची विचारणा केली असता मी त्यांना माझे बचतीतील सोबत आणलेले रु. २०,०००/– रुपये काढुन दिले. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात सापळापुर्व कारवाई पुर्ण करण्यात आली. अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात असताना संध्याकाळी ०४.१५ वाजताचे सुमारास श्री हरिकृष्णा यांचा माझे मोबाईलवर कॉल आला. तो कट झाल्याने मी पुन्हा त्यास त्याचे मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी लाचेची रक्कम घेवून संध्याकाळी ०५.३० वाजता पर्यत येण्यास सांगितले. त्यामुळे सापळा कारवाईकरीता परचाके साहेब, माळी साहेब, मी, दोन्हीं पंच व पोलीस पथक दोन पोलीस वाहनातुन छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल हायस्कुल गेटजवळ, वीर जिजामाता रोड, गोवंडी पश्चिम, मुंबई येथे गेलो. तेथे गेल्यावर मी माझे मोबाईलवरुन श्री हरिकृष्णा यांना कॉल केला असता त्यांनी मला 'जाहिद टी स्टॉल' वीर जिजामाता रोड, गोवंडी पश्चिम, मुंबई येथे लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. श्री. परचाके साहेब व माळी साहेब यांनी मला, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री जमदाडे यांचेसोबत 'जाहिद टी स्टॉल' येथे लोकसेवक हरिकृष्णा यांना भेटण्यास पाठविण्यात आले. सापळा पथक सुध्दा काही अंतर थांबुन हजर होते. तेथे गेल्यानंतर श्री हरिकृष्णा दिसुन न आल्याने मी 'जाहिद टी स्टॉल' चे मालक श्री जाहिद अली यांचेकडे चौकशी केली असता श्री हरिकृष्णा आले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी श्री हरिकृष्णा यांच्या मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी कामानिमित्त बाहेर आलेलो आहे नंतर कॉल करतो असे सांगितले. त्यामुळे मी व पंच जमदाडे छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल हायस्कुलपाशी थांबलेल्या सापळा पथकाजवळ परत आलो.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर थोडयावेळाने श्री हरिकृष्णा यांचा मोबाईलवर कॉल आला व त्यांनी पुन्हा 'जाहिद टी स्टॉल' येथे लाचेची रक्कम घेवून बोलाविले. पुन्हा माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री माने यांचेसोबत 'जाहिद टी स्टॉल' येथे श्री हरिकृष्णा यांना भेटण्यास पाठविण्यात आले. सापळा पथक सुध्दा काही अंतर थांबुन हजर होते. मी व पंच श्री माने तेथे गेलो असता श्री हरिकृष्णा भेटले. श्री हरिकृष्णा यांनी पंचासमक्ष माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी माझे पायजमाच्या खिशातील लाचेची रक्कम रू. २०,०००/— काढुन श्री हरिकृष्णा यांचेकडे दिली. श्री हरिकृष्णा यांनी सदर रक्कम स्विकारून ती त्यांचे पॅटच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर लाचेची रक्कम दिल्याबाबत माझे डोक्यावरील टोपी दोंन्ही हातानी काढुन मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. लगेचच सापळा पथकामधील अंमलदारांनी तेथे येवून श्री हरिकृष्णा यास ताब्यात घेतले. श्री. परचाके साहेब यांनी त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने श्री. हरिकृष्णा आदिमुलम, पद — कामगार, खाते — नगर अभियंता, बीएमसी, एम पुर्व वार्ड, गोवंडी, मुंबई. रा.ठि. रुम नं. ६, देवनार म्युनिसिपल कॉलनी, पठान चाळ, गोवंडी, मुंबई ४३ असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या उजव्या खिशात मी दिलेली लाचेची रक्कम रु. २०,०००/— मिळुन आली. ती पंच श्री माने यांच्या ताब्यात देण्यात आली. त्यानंतर श्री हरिकृष्णा आदिमुलम याने त्याचे मोबाईलवरुन श्री कांबळे यास कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. थोडयावेळात कांबळे यांनी हरिकृष्णा आदिमुलम याचे मोबाईलवर कॉल केला. त्यावेळी मी लाचेची रक्कम रु. २०,०००/— दिल्याबाबत हरिकृष्णा आदिमुलम यांनी लोकसेवक कांबळे यांनी सांगितले.

तरी श्री हरिकृष्णा आदिमुलम, वय ३२ वर्षे, पद — कामगार, खाते — नगर अभियंता, बीएमसी, एम पुर्व वार्ड, गोवंडी, मुंबई व श्री राहुल कांबळे, पद — ज्युनिअर इंजिनिअर, बीएमसी, एम पुर्व वार्ड, गोवंडी, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या फायदयाकरीता मी केलेल्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई न करण्यासाठी माझेकडे रू. २०,०००/— लाचेची मागणी केली व श्री हरिकृष्णा आदिमुलम यांना लाचेची रक्कम रू. २०,०००/— स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून माझी त्या दोघांच्या विरोधात तक्रार आहे.

माझा वरील मराठी भाषेतील जबाब मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(गणपत परचाके)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांनी गौतम नगर, गोवंडी, मुंबई येथे बांधकाम करण्याचे काम घेतले होते. सदर बांधकामात २४ फुटावर बांधकाम केले असून त्यावर निष्कासनाची कारवाई न करण्यासाठी यातील आरोपितांनी फिर्यादी यांचेकडे ५०,०००/- रु. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- लाच स्विकार- ण्याची तयारी दर्शविल्याने केलेल्या सापळा कारवाईत आरोपी क्र. १ हरिकृष्ण आदिमुलम यास २०,०००/- लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले आहे म्हणून गुन्हा.

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : गणपत रघुनाथ पस्ताके, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name गणपत पस्ताके

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई
Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख १६/०६/२०२४
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner